जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८५६ दिनांक - ०९/१२/२०२३**

शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे शहर

## मौजमजेसाठी मोटारसायकल चोरी करणा-या आरोपीस केले जेरबंद त्यांचेकडुन चार मोटार सायकली केले जप्त

यातील फिर्यादी यांनी त्यांची मोटार सायकल पांढरे रंगाची होंडा ॲक्टीव्हा ८०,०००/- रु.कि.ची खुडे ब्रिजवर शिवाजीनगर पुणे येथे पार्क करुन ठेवलेली असताना कोणीतरी अज्ञात इसमाने लबाडीच्या इरादयाने चोरी केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत वाहन चोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी व घडलेल्या गुन्हयाची उकल करण्याचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांनी दिलेल्या सुचनानुसार सपोनि नाईक व स्टाफ असे पथक वाहन चोरांची व चोरीस गेलेल्या वाहनांची माहीती संकलीत करुन तांत्रीक तपासाच्या आधारे मिळालेल्या गोपनीय बातमीनुसार **हेमंत बाजीराव लगड वय- ५२ वर्षे,रा. ११९७, रामनारायण बंगला, एफ.सी.रोड, शिवाजीनगर, पुणे** यास डेक्कन परिसरातुन सपोनि बाजीराव नाईक, पोलीस अंमलदार वाघमारे, अतुल साठे, प्रविण राजपुत यांनी ताब्यात घेवून सखोल तपास करुन दिनांक ०८/१२/२०२३ रोजी अटक करुन कसुन तपास केला असता त्याने व त्याचा मित्र परदेशी ऊर्फ चिकन्या वय-२५ वर्षे, रा.पत्ता माहीत नाही यांनी आणखी मोटारसायकल चोरी केल्या असल्याचे सांगितल्याने पंचनाम्या अंतर्गत खालील प्रमाणे चोरी केलेल्या एकुण-३,१०,०००/- रु.किच्या चार मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत.

१)८०,०००/-र. कि.ची **होंडा ॲक्टीव्हा पांढरे रंगाची**
२) ३०,०००/-र. कि.ची होंडा शाईन काळया रंगाची
३) १,२०,०००/-र. कि.ची **बजाज पल्सर काळया रंगाची**
४) ८०,०००/-र. कि.ची **सुझुकी ॲक्सेस काळया रंगाची**

**त्यांचेकडुन उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे:-**
१)शिवाजीनगर पोलीस स्टेशन गु.र.क्र. २४५/२०२३ भादवि.कलम ३७९,३४
२)शिवाजीनगर पोलीस स्टेशन गु.र.क्र. २२३/२०२३ भादवि.कलम ३७९,३४
३) बंडगार्डन पोलीस स्टेशन गु.र.क्र.३७५/२०२३ भादवि.कलम ३७९

सुझुकी ॲक्सेस काळया रंगाची मोटारसायकल संदर्भात त्याचे मालकाचा शोध घेवून पुढील कारवाई करण्यात येत आहे.तसेच पाहीजे आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ श्री.संदीपसिंह गिल व मा.सहा.पोलीस आयुक्त विश्रामबाग विभाग श्री. वसंत कुवर यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वपोनि श्री.अरविंद माने, पोनि (गुन्हे) श्री. विक्रम गौड,सपोनि बाजीराव नाईक,पोलीस अंमलदार रुपेश वाघमारे,अतुल साठे,वालकोळी,प्रविण राजपुत,खुरंगे,तुकाराम म्हस्के, शरद राउत महिला पोलीस अंमलदार रुचिका जमदाडे यांनी केली आहे.